
पुण्य नगरी | रविवार, १४ सप्टेंबर २०२५

# सेवाभाव ठेवूनच राष्ट्रीय सेवा योजनेत काम करावे

## अरुण कुलकर्णी; 'विवेकानंद'मध्ये एन.एस.एस.चे उद्घाटन

**कोल्हापूर :** राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी विद्यार्थ्यांनी सेवाभाव व बंधूभाव समोर ठेवून कार्य करावे. स्वतःमध्ये नेतृत्वगुण विकसित करावेत. स्वामी विवेकानंदांचे आचार व विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत, राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी झाल्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते. समाजसेवा म्हणजे फक्त श्रमदान नसून सर्वगुणसंपन्न बनण्याची संधी आहे, असे प्रतिपादन विवेकानंद केंद्राचे संचालक अरुण कुलकर्णी यांनी केले.

स्वामी विवेकानंद कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटनप्रसंगी व विश्वबंधूता दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते.



राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना केंद्र संचालक अरुण कुलकर्णी.

पार्थ जाधव व श्वेता पाटील या विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केले. रोपास पाणी घालून व शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे रचित संस्था प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्वागत व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बी. टी. दांगट यांनी केले. डॉ. जी. एस. उबाळे, प्रा. हेमंत पाटील यांनी आभार मानले. प्रा. डॉ. संपदा टिपकुर्ले यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. संदीप पाटील, प्रा. प्रवीण बागडे, डॉ. राजश्री पाटील, डॉ. जी. एस. उबाळे व स्वयंसेवक उपस्थित होते.

# 'लैंगिक छळाबाबत पारदर्शक संवाद गरजेचा'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांमध्ये लैंगिक छळाबाबत जागरूकता आवश्यक असून पारदर्शक संवाद गरजेचा आहे असे प्रतिपादन डॉ. अस्मिता पाटील यांनी केले.

विवेकानंद कॉलेज येथे अंतर्गत तक्रार समितीचे कार्य व भूमिका या विषयावर व्याख्यानप्रसंगी त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार अध्यक्षस्थानी होते. डॉ. पाटील यांनी या समितीची रचना व सुरुवात कशी झाली व समितीचे कार्य कसे चालते, समितीला असलेले अधिकार, २०१३ चा लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा या संदर्भात मार्गदर्शन केले. डॉ. उर्मिला खोत यांनी स्वागत केले. डॉ. कविता तिवडे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. नीता पाटील यांनी केले. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या प्रमुख डॉ. श्रुती जोशी, प्रा. सृष्टी कोरे, प्रा. मंगेश खोले उपस्थित होते.

# रामदास आठवले आज कोल्हापूर दौऱ्यावर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले रविवारी (दि. १४) कोल्हापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा सविस्तर दौरा पुढील प्रमाणे.

सकाळी १०.३० वाजता विमानतळावर आगमन. सकाळी ११ वाजता स्वामी विवेकानंद कॉलेज, नागाळा पार्क येथे दिव्यांग सक्षमीकरणासाठी सहायक उपकरणे आणि साधनांचे वितरण कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी ३.३० वाजता त्यांच्या प्रमुख उपस्थितीत हुपरी येथे महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. दुपारी ४.३० वाजता दसरा चौक येथील कार्यक्रमास उपस्थिती. रात्री ७ वाजता ते कराडकडे प्रयाण.

)/25

6.9.25

पुण्यनगरी

रविवार, १४ सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'मध्ये 'तक्रार समिती'बाबत व्याख्यान

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (अधिकार प्रदत्त स्वायत संस्था) येथे अंतर्गत 'तक्रार समितीचे कार्य व भूमिका' या विषयावर डॉ. अस्मिता पाटील यांचे व्याख्यान झाले. त्यांनी समितीची रचना व सुरुवात कशी झाली, तसेच या समितीचे कार्य कसे चालते, याचे मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अंतर्गत समितीचे महत्त्व निर्विवाद असल्याचे मनोगत व्यक्त केले. स्वागत व प्रास्ताविक डॉ. उर्मिला खोत यांनी केले. आभार डॉ. कविता तिवडे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. नीता पाटील यांनी केले. कार्यक्रमास अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या प्रमुख डॉ. श्रुती जोशी, समिती सदस्य प्रा. सृष्टी कोरे, प्रा. मंगेश खोले आदी उपस्थित होते.

15/9/25